देशभरातल्या १५ विमानतळ प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमीपूजन उत्तरप्रदेशात आझमगढ इथून दूरस्थ पद्धतीने आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. देशात नागरीकरण झपाट्यानं होत असून त्यामुळे सामान्यांचं जगणं सुखकर होत आहे असं ते म्हणाले. पुणे आणि कोल्हापूर सह देशातल्या १२ विमानतळांमधल्या नवीन टर्मिनलचं उद्घाटन तसंच हुबळी आणि कडप्पा सह ३ विमानतळांवरच्या नवीन टर्मिनलची पायाभरणी मोदी यांनी दूरस्थ पद्धतीने केली. कोल्हापूर इथून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पुण्याहून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

पुण्याच्या लोहगाव विमानतळावर एकंदर ५३ हजार चौरस मीटर जागेवर उभारण्यात आलेल्या या टर्मिनल साठी अंदाजे ४७५ कोटी रुपये खर्च झाला आहे. विमानतळाची प्रवासी क्षमता आता दुप्पट होणार असून प्रवाशांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवा सुविधा मिळणार आहेत.

या विस्तारित टर्मिनल मुळे पुण्यात उद्योग वाढीला चालना मिळणार असून नव्या विमानतळाच्या माध्यमातून पुण्याच्या जीडीपी मध्ये किमान २ टक्के वाढ होईल असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. येत्या ३ - ४ वर्षात पुरंदर तालुक्यात नवा विमानतळ उभाणार असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संगितलं.

<><><><><>

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-२ च्या बाजूने उभारलेला उड्डाणपूल आज वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांची विशेष उपस्थिती होती. या उड्डाणपुलामुळे

टर्मिनल-२ आणि टर्मिनल-१ कडून वांद्र्याच्या दिशेने जाणाऱ्या गाड्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

<><><><><>

निवडणूक आयुक्त अरूण गोयल यांनी आयुक्त पदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोयल यांचा राजीनामा स्विकारला आहे. गोयल यांच्या राजीनाम्यामुळं निवडणूक आयोगामध्ये आयुक्तांची दोन पदं रिक्त झाली आहेत. गोयल यांनी नोव्हेंबर २०२२ मध्ये निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्विकारला होता.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी उमेदवार जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. यात बारामतीमधे सुप्रिया सुळे यांच्या नावाची घोषणा शरद पवारांनी केली असून, वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघात अमोल कीर्तिकर यांच्या नावाची घोषणा उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

<><><><><>

धाराशिव जिल्ह्यात या महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाच्या तीव्रतेमुळे पाणीटंचाईत दिवसेंदिवस वाढ असून, जिल्ह्यात सध्या ११ टँकर आणि ५४ विंधन विहीरी आणि विहीर अधिग्रहणातून पाणीपुरवठा केला जात आहे. या पाणीटंचाईच्या संकटांचा सामना करण्यासाठी टँकर आणि विंधन विहीरी आणि विहीरींच्या अधिग्रहणाचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

<><><><><>

प्राप्तिकर विभाग २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी ॲडव्हान्स टॅक्स-ई-मोहीम हाती घेणार आहे. या आर्थिक वर्षात काही व्यक्तींनी आणि संस्थांनी केलेल्या विशिष्ट आर्थिक व्यवहारांची माहिती प्राप्तिकर खात्याला मिळाली असल्याचं केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं सांगितलं. भरणा केलेला कर आर्थिक व्यवहारांशी सुसंगत नसलेल्या

व्यक्ती आणि संस्था आतापर्यंत भरलेल्या करांच्या विश्लेषणातून विभागानं हुडकून काढल्या आहेत. त्यासाठी प्राप्तिकर खात्यानं ई-मोहीम हाती घेतली आहे. ई-मेल आणि एसएमएसद्वारे महत्त्वपूर्ण आर्थिक व्यवहारांची माहिती देणं हा त्या मोहिमेचा उद्देश आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज मुंबईत, मुंबई आणि विदर्भ यांच्यात सुरु आहे. विदर्भानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. मुंबईनं सुरुवात चांगली केली, मात्र त्यांची मधली फळी ढेपाळली.
शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबईच्या ८ बाद २०२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

चेक रिपब्लिकच्या क्रिस्टिना प्रीझकोव्हानं मुंबई इथं काल झालेल्या मिस वर्ल्ड २०२४ च्या भव्य कार्यक्रमात ७१ वा मिस वर्ल्ड चा किताब जिंकला. या सौंदर्य स्पर्धेत ११५ देशांतल्या स्पर्धकांनी भाग घेतला होता. मागच्या वर्षीची मिस वर्ल्ड पोलंडची कॅरोलिना बिलावस्का हिनं क्रिस्टिनाला मुकुट चढवला. लेबनॉनची यास्मिन जायतौन या स्पर्धेत उपविजेती ठरली. क्रिस्टिना कायद्याची विद्यार्थिनी असून ती सामाजिक कार्यकर्ती आणि आंतरराष्ट्रीय मॉडेलही आहे.

//<><><><><>//